प्रेस नोटः- दि.०३/०८/२०१९

**घरफोडी चोरी व खिसेकापू चोरी करणारे सराईत गुन्हेगार विश्रामबाग पोलीसांच्या जाळयात**

विश्रामबाग पोलीस ठाणेच्या हददीत लक्ष्मीरोड,जोगेश्वरी मंदिर मार्ग, तुळशीबाग भागात काही दिवसापुर्वी रात्रीच्या वेळी घर फोडया करुन चो-या करण्याचे प्रमाणे वाढले होते. त्या अनुषंगाने तपास करत असतांना लक्ष्मीरोड वरील भारत वुलन शॉपची बाहेरील बाजुस असलेली काच फोडून चोरटयाने १,९३,०००/- रूपये रोख चोरी केली होती. त्याअनुषांगने सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करून केलेल्या तपासावरून सीसीटीव्ही फुटेज मध्ये रिक्षाचा नंबर प्राप्त करून त्या वरून रिक्षाचा शोध घेऊन रिक्षा अंबिल ओढा परिसरात मिळून आल्याने सदर रिक्षा चालकाचा शोध घेतला असता पो.ना. ६४५० पवार यांना मिळालेल्या बातमी वरुन दत्तवाडी, हडपसर, वानवडी,खडक पोलीस ठाण्यात घर फोडी, वाहनचोरी, जबरीचोरी, व विनयभंग सारखे एकुण ९ गुन्हे दाखल असलेला सराईत गुन्हेगार रोहित ऊर्फ रवि अशोक खुडे वय २० धंदा- बेकार रा. १३३ दांडेकर पूल अंबिल ओढा पुणे यांने वरील गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले.त्याचा मिळालेला मोबाईल नंबर वरून तांत्रिक माहिती वरून तो मुंबई येथे असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास मुंबई बांद्रा येथे जावून अटक करुन त्याच्याकडुन ३ घरफोडी व २ वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणून ५२,०००/- रोख रुपये १,००,०००/- रूपयाची १ रिक्षा, दोन मोटार सायकल हस्तगत केल्या आहेत.

तसेच दिनांक २६/७/२०१९ रोजी तुकाराम महाराज पालखी नवी पेठ विठ्ठल मंदिर येथे मुक्कामी असताना तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक विजय जाधव व स्टाफ पेट्रोलिंग करीत असताना इसम नामे सुनिल सुरेश यादव वय- २० धंदा- बेकार रावडगाव बुद्रुक, ता. आळंदी जि.पुणेहा गर्दीच्या ठिकाणी संशयीत फिरत असताना मिळून आल्याने त्यांस ताब्यात घेऊन त्यांचे तपास करता त्यांने विश्रामबाग पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर २७१/१९ भादवि क ३७९ केल्याचे कबुल केल्याने त्याच्याकडुन दाखल गुन्हयातील मोबाईल १,०००/- रु कि.चा, व इतर गुन्हयातील ३८,०००/- रू. कि. चे मंगळसुत्र जप्त करण्यात आल्या असून विश्रामबाग पोलीस ठाण्याकडील एकुण४ गुन्हे, उघडकीस आणले आहेत.

वरील कामगिरीअपर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशीक विभागमा. श्रीकांत तरवडे परिमंडळ १ च्या पोलीस उप-आयुक्त स्वप्ना गोरे, सहा. पोलीस आयुक्त सुधाकर यादव विश्रामबाग विभाग पुणेयांचे मार्गदर्शनाखाली विश्रामबाग पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल कलगुटकर पोलीस निरीक्षक गुन्हे दादासाहेब चुडाप्पा, उप निरीक्षक विजय जाधव ,पोलीस हवालदार शरद वाकसे, पोलीस नाईक धिरज पवार, बाबा दांगडे, सुरेंद्र जगदाळे, पो. शि.संजय बनसोडे, चेतन शिरोळकर, राहुल पवार, प्रशांत शिंदे यांनी केली आहे. अधीक तपास विश्रामबाग तपास पथकाचे पोलीस उप-निरीक्षक विजय जाधव हे करीत आहेत.